# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

## कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर

५३९ ,कसबा करवीर राजेंद्र नगर कोल्हापूर- ४१६ ००४


क्र.कोविमं/उमा/प्रात्य/ऑनलाईन/ 1212
कोल्हापूर ४१६००४
दिनांक- २२ /०७ /२०२२
२५

प्रति,
प्राचार्य,
जुलै/ऑगस्ट २०२२
माहिती तंत्रज्ञान,ऑनलाईन परीक्षा घेणारी
कनिष्ठ महाविद्यालये.

**विषय - इयत्ता १२ वी "माहिती तंत्रज्ञान"(I.T.) व "सामान्यज्ञान"(G.K.) या विषयाचे गोपनीय साहित्य घेणेसाठी I.T. शिक्षक पाठविणेबाबत.**

संदर्भ - पत्र क्र.रां.मं/ऑनलाईन/आय.टी./३२६७ / दिनांक ०६ जुलै २०२२.

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा जुलै २०२२ च्या "माहिती तंत्रज्ञान"(I.T.) व "सामान्यज्ञान"(G.K.) या विषयाच्या ऑनलाईन परीक्षा या आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयाध्ये होत आहेत. माहिती तंत्रज्ञान विषयाची दिनांक ०३ व ०४ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी ३:०० ते ०५:३० याप्रमाणे आयोजित करण्यात आली आहे.

तसेच सामान्यज्ञान विषयाची ऑनलाईन परीक्षा दिनांक ०३ व ०४ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी ३:०० ते ५:०० याप्रमाणे आयोजित करण्यात आली आहे. जे विद्यार्थी तांत्रिक व्यत्यय व अन्य कारणांमुळे निर्धारित वेळापत्रकानुसार परीक्षा देऊ शकणार नाहीत त्यांच्यासाठी खास बाब म्हणून सर्व परीक्षा केंद्रावर दिनांक ०५ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी ०३.०० ते ०५:३० "माहिती तंत्रज्ञान" (I.T.) व दुपारी ०३.०० ते ०५:०० "सामान्यज्ञान" (G.K.) या विषयांसाठी पुर्नपरीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**सदरच्या परीक्षेचे साहित्य आपणांस दिनांक २७/०७/२०२२ रोजी देण्यात येणार आहे.** सदर दिवशी I.T. विषयाचे समन्वयक यांचे समवेत ऑनलाईन परीक्षेसंदर्भात मंडळ कार्यालयात सभा अयोजित करण्यात आली असल्यांमुळे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा माहिती तंत्रज्ञान (I.T) विषय शिक्षकच मंडळ कार्यालयात सकाळी ११:०० वाजता साहित्य स्विकारणेसाठी अधिकार पत्र घेऊन पाठवून देणेत यावे. परीक्षा सुरळीत पार पाडण्यात यावी **व सदर परीक्षेचे परीक्षोत्तर साहित्य परीक्षा झाल्यानंतर दिनांक ०६/०८/२०२२ रोजी कार्यालयात जमा करावयाचे आहे याची नोंद घ्यावी.**

(दत्तात्रय पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.